**राज्य शासनाच्या सेवेतील निलंबित**
**अधिकारी / कर्मचारी यांच्या विभागीय चौकशीबाबत.**

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : सीडीआर-१००६/प्र.क्र.२/०६/११-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : **२५ जुलै, २००६**

वाचा : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक , सीडीआर-११७९/४५/११,
दिनांक २१ मे, १९७९
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग सीडीआर-११८३/६५३/३४/११
दिनांक २७ मे, १९८३

## परिपत्रक :

विभागीय चौकशीची प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासाठी शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे सूचना करण्यात आल्या आहेत.

**१)** प्रत्येक विभाग / कार्यालय प्रमुखाने प्रत्येक महिन्याला विभागीय चौकशीचा प्रगती आढावा घ्यावा व प्रकरण लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

**२)** प्रत्येक विभाग / कार्यालय प्रमुखाने मंत्रालयीन प्रशासकीय विभागात २१ मे, १९७९ च्या परिपत्रकात दिलेल्या नमुन्यानुसार विहित प्रपत्रात त्रैमासिक अहवाल सादर करावा. त्यामध्ये १ जानेवारी , १ एप्रिल, १ जुलै व १ ऑक्टोबर मधील विभागीय चौकशी सद्यस्थिती १५ जानेवारी, १५ एप्रिल , १५ जुलै, व १५ ऑक्टोबर, पर्यंत सादर करावी .

**३)** प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्याच नमुन्यातील विहीत प्रपत्रात सामान्य प्रशासन विभागास १ जानेवारीचा अहवाल ३१ जानेवारीपर्यंत व १ जुलैचा अहवाल ३१ जुलैपर्यंत सादर करावा.

**४)** विभाग / कार्यालय प्रमुखाने सादर केलेल्या त्रैमासिक अहवालातील विभागीय चौकशी प्रकरणांचा प्रगती आढावा घेण्यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभागाने उपसचिव दर्जाच्या अधिका-याची नेमणूक करावी. सदर अधिका-याने चौकशी पूर्ण करण्यास ज्या स्तरावर विलंब झाला आहे. ती बाब सचिवांच्या निर्देशनास आणावी व विलंबास जबाबदार असणा-या संबधितांवर जबाबदारी निश्चित करावी.

**२.** उपरोक्त सूचनांचे अनुपालन योग्यरीतीने न झाल्यामुळे विभागीय चौकशीची प्रकरणे विहित कालावधीत निकाली काढण्यात येत नाहीत, ही बाब लोकलेखा समितीच्या १३ व्या (१९७६-७७) अहवालातही अधोरेखित करण्यात आली आहे. विभागीय चौकशी विलंबाने पूर्ण झाल्यास पर्यायाने निलंबित अधिकारी/कर्मचारी यांचे

निलंबन लांबते व त्यामुळे त्यांना द्यावा लागणारा निलंबन भत्त्याचा आर्थिक भार शासनास सोसावा लागतो तसेच याबाबत अधिवेशन काळात विधान सभागृहात तारांकित प्रश्न उपस्थित झाल्यास किंवा माहितीचा अधिकार अधिनियम २००६ अन्वये अर्जदाराने माहिती मागितल्यास ती विहित कालमर्यादेत सादर करणे आवश्यक असते. तथापि, अद्यापही काही प्रशासकीय विभागाकडून याबाबत गांभीर्याने लक्ष देऊन कार्यवाही केली जात नाही, असे निदर्शनास आले आहे.

३. वरील परिपत्रकामधील सूचनांचा पुनरुच्चार करण्यात येत असून, सर्व प्रशासकीय विभागानी त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांना उपरोक्त परिपत्रकातील तसेच या परिपत्रकात वर नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना द्याव्यात. तसेच, संकलित विहित त्रैमासिक अहवाल विहित कालावधीतच सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात येतील, याबाबत कृपया सर्व प्रशासनिक विभागांनी दक्षता घ्यावी.

४. सदर परिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०७२५१७०५२५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(का. तु. सातकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत:-

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखलील विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख
निवड नस्ती.

Desk 9 A Circular d.d. 25/07/2006

# विवरणपत्र

**विभागाचे नाव :-** **त्रैमासिक अहवाल**

| कालावधी | निलंबीत केलेल्यांची गटनिहाय संख्या | | | | निलंबित व विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेल्यांची माहिती | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | निलंबित व विभागीय चौकशी सुरु न करण्यात आलेल्यांची माहिती | | | | | | | | लाचेच्या किंवा अपसंपदा प्रकरणी खटला दाखल करण्यात आला असल्यास त्याचा क्रमांक व सद्यस्थिती | | | | निलंबित अधिकारी / कर्मचारी यांच्या निर्वाह भत्त्यापोटी आलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | त्यापैकी विभागीय चौकशी सुरु केलेल्यांची गटनिहाय संख्या | | | | त्यापैकी विभागीय चौकशी पूर्ण झालेल्यांची गटनिहाय संख्या | | | | विभागीय चौकशीअंती सेवेतून कमी केलेल्यांची गटनिहाय संख्या | | | | विभागीय चौकशीअंती पुन्हा सेवेत घेण्यात आलेल्यांची गटनिहाय संख्या | | | | विभागीय चौकशी प्रलंबित असलेल्यांची संख्या | | | | विभागीय चौकशी प्रलंबित असताना पुनःस्थापित केलेल्यांची गटनिहाय संख्या | | | | विभागीय चौकशी सुरु न केलेल्यांची गटनिहाय संख्या | | | | विभागीय चौकशी सुरु न करता पुनःस्थापित केलेल्यांची गटनिहाय संख्या | | | | | | | | |
| १ | २ | | | | ३ | | | | ४ | | | | ५ | | | | ६ | | | | ७ | | | | ८ | | | | ९ | | | | १० | | | | ११ | | | | १२ |
| | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड | अ | ब | क | ड | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

( )

नाव व पदनाम